पुढारी कोल्हापूर शनिवार, ७ मार्च २०२६

# ‘यूपीएससी’मध्ये कोल्हापूरचा डंका

## सेल्फ स्टडीवर भर दिल्यानेच यश



हर्षवर्धन पाटील तुरुकवाडीचे (ता. शाहूवाडी) आहेत. त्यांचे एकत्रित कुटुंब आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापुरातील श्रीराम हायस्कूल व माध्यमिक शिक्षण शाहू हायस्कूलमध्ये झाले. त्यानंतर विवेकानंद कॉलेजमध्ये अकरावी, बारावीचे शिक्षण घेतले. कोल्हापुरातील केआयटी कॉलेजमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंगमधून पदवीचे शिक्षण पूर्ण केले. खासगी कंपनीत एक वर्ष नोकरी केली; परंतु यूपीएससी परीक्षेचा अभ्यास करण्याचे ध्येय ठरविले, त्यानुसार दिल्ली येथे जाऊन यूपीएससी परीक्षेच्या अभ्यास सुरू केला. पर्यायी विषयासाठी खासगी शिकवणी लावली असली, तरी स्वतःवर विश्वास ठेवून सेल्फ स्टडीवर भर दिला. स्वतःवर विश्वास ठेवून अभ्यास केला. इंग्रजी भाषा येईल की नाही, असा न्यूनगंड न बाळगता अभ्यास करीत राहिलो. त्यामुळे यश संपादन करणे शक्य झाल्याचे हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.

महाराष्ट्राचे लोकप्रिय दैनिक
पुण्य नगरी
कोल्हापूर शनिवार, ७ मार्च २०२६

# तुरुकवाडीचा सुपूत्र व उचगावची कन्या यांची यूपीएससीत गगनभरारी



**कोल्हापूर :** जिद्द, चिकाटी आणि एकत्र कुटुंबाच्या भक्कम पाठबळावर कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी तालुक्यातील तुरुकवाडी येथील सुपुत्र हर्षवर्धन हरिश्चंद्र पाटील यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत ३४९ वी रँक मिळवून देदीप्यमान यश संपादन केले.

हर्षवर्धन यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूरच्या श्रीराम विद्यालय येथे झाले, तर माध्यमिक शिक्षण ▶▶ पान ७ वर...

## तुरुकवाडीचा सुपूत्र...

श्री शाहू छत्रपती विद्यालय (जुना बुधवार पेठ) येथे पूर्ण झाले. त्यानंतर त्यांनी विवेकानंद कॉलेजमधून ११ वी आणि १२ वीचे शिक्षण घेतले. तांत्रिक शिक्षणाची ओढ असल्याने त्यांनी केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी संपादन केली.

स्पर्धा परीक्षेत उतरण्यापूर्वी त्यांनी पुण्यातील टीसीएस या नामांकित कंपनीत एक वर्ष सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून नोकरी केली; मात्र प्रशासकीय सेवेत जाऊन समाजाची सेवा करण्याचे ध्येय त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते.

आईचे संस्कार आणि भावांचे भक्कम मार्गदर्शन हर्षवर्धन यांच्या या यशात त्यांच्या ४० जणांच्या मोठ्या एकत्र कुटुंबाचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे वडील प्रा. डॉ. हरिश्चंद्र पाटील हे निवृत्त प्राध्यापक आहेत, तर आई गृहिणी असून त्यांच्या संस्कारांच्या शिदोरीवरच हर्षवर्धन यांनी हे यश संपादन केले आहे. कुटुंबातील मोठ्या भावांचे मार्गदर्शन या प्रवासात दिशादर्शक ठरले. निवृत्त पॅरा कमांडो संजय पाटील यांनी घरातील १० भावंडांच्या शिक्षणासाठी अथक मेहनत घेतली, तर प्रा. अजय पाटील यांच्या मोलाच्या मार्गदर्शनामुळे अभ्यासाची अचूक दिशा सापडल्याचे हर्षवर्धन यांनी आवर्जून सांगितले.

महाराष्ट्राचे लोकप्रिय दैनिक
पुण्य नगरी
कोल्हापूर । शनिवार, ७ मार्च २०२६



# सृष्टी कुलकर्णीची बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**कोल्हापूर** : जयपूर येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिला बुद्धिबळ स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाची विद्यार्थिनी सृष्टी कुलकर्णी बी.बी.ए भाग-३ हिने सिल्व्हर मेडल प्राप्त केले. या कामगिरीच्या जोरावर मेरठ येथे होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी बुद्धिबळ महिला स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघामध्ये आपले स्थान निश्चित करून पुढील स्पर्धेकरिता ती पात्र ठरली. यशाबद्दल सृष्टी कुलकर्णी हिला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले.